## संजीवन अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांमार्फत स्वच्छताअभियान -

**पन्हाळा : प्रतिनिधी**




पन्हाळा येथील संजीवन अभियांत्रिकी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना (एन. एस. एस.) विभागाच्या विद्यार्थ्यांमार्फत 'स्वच्छ भारत अभियान ' अंतर्गत महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर स्वच्छता अभियान घेण्यात आले. शनिवार दि. ५ रोजी होलीवूड अकॅडमी अंतर्गत संजीवनच्या विविध शाखांचे स्नेहसंमेलन सदरच्या क्रीडांगणावर पार पडले होते. यावेळी सर्वच विभागाच्या विद्यार्थ्यांचे पालक व परिसरातील लोक कार्यक्रमाला उपस्थित होते. यावेळी अल्पोपहार व इतर खाण्याच्या वस्तूंचे वेस्टेज व रिकाम्या पाण्याच्या बाटल्या असा सर्व प्रकारचा कचरा यावेळी क्रीडांगणावर विखरून पडला होता.

तो सर्व कचरा गोळा करून त्याची विल्हेवाट लावण्यात आली. सदर स्वच्छता अभियानासाठी महाविद्यालायातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील सर्व विद्यार्थी-विद्यार्थीनी यांच्यासह अनेक विद्यार्थ्यांनी उस्पुर्थपणे सहभाग घेतला. राष्ट्रीय सेवा योजना चे समन्वयक प्रा.

रणजीत इंगवले, विद्यार्थी प्रतिनिधी अजय पाटील व विद्यार्थिनी प्रतिनिधी स्नेहल पाटील  यांनी स्वच्छता अभियानाचे शिस्तबद्ध नियोजन केले. सदर कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन बी. वनरोट्टी  यांच्यासह संस्थेचे चेअरमन पी. आर. भोसले आणि सहसचिव एन. आर. भोसले यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

**फोटो ओळी**–

पन्हाळा : ‘स्वच्छ भारत अभियान’ अंतर्गत स्वच्छता अभियानामध्ये सहभागी महाविद्यालायातील विद्यार्थी-विद्यार्थीनी, प्रा. रणजीत इंगवले, संग्राम पाटील यांच्यासह ईतर मान्यवर.